**सायबर सेल, पिंपरी चिंचवड**
**पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड, प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे दुरध्वनी क्रंमाक ०२०-२७३५०१२०**

| प्रेसनोट | पिंपरी चिंचवड | दिनांक - ०१/०६/२०२४ |
|---|---|---|

# फसवणुक करणाऱ्या व दुबई येथील व्यक्तीस बनावट अकाऊंट देण्यासाठी कुप्रसिध्द असलेला जिल्हा सिकर राजस्थान येथील आरोपीस सायबर सेल पिंपरी चिंचवड कडुन अटक

पिंपरी चिंचवड बावधन येथील महिलेस यांना +६३९५१५८३३९१७ या नंबर वरुन व्हॉटसअप मेसेज करुन विश्वास संपादन करुन गुगल रेटिंग टास्क देवुन पुर्ण केल्यास एक्स्ट्रा रक्कम देतो असे सांगुन टेलीग्राम @Raharani-67812367799/@Deepak-chopra6472323 आयडी जॉईन करुन खोटे बोलुन वेगवेगळे कारण सांगुन अकाऊंट डिटेल्स घेवुन आरोपीचे खात्यात रक्कम भरावयास प्रवृत्त करुन महिले कडुन एकुण २,४५,०००/- रु ऑनलाईन टास्क पुर्ण करण्याकरीता घेवून फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. फिर्यादी यांची २,४५,०००/- रु फसवणुक झाल्याने फिर्यादी यांनी हिंजवडी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं ६४८/२०२४ भादवि कलम ४१९,४२०,४०६, आय.टी ॲक्ट ६६(सी) ६६(डी) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याबाबत फिर्यादी यांनी एन.सी.सी.आर पोर्टल क्रं._21904240000389/31903240040665 अन्वये सायबर क्राईला तक्रार दाखल केली होती.

सदर गुन्हयाचा समांतर तांत्रिक तपास सायबर सेलचे सहा.पोलीस निरीक्षक प्रवीण स्वामी व पोलीस उपनिरीक्षक सागर पोमण हे करीत होते. त्यांनी तांत्रिक तपास केला असता फिर्यादी यांनी ९५,०००/- रु IndusInd Bank अकाऊंटला पैसे पाठविण्यात आले होते. सदर अकाऊंट स्टेटमेंटचा तांत्रिक तपास केला असता आय.सी.आय.सी.आय बँक अकाऊंटला ३,००,०००/- रुपयाचे ट्रान्झेक्शन झाले असल्याची माहीती प्राप्त झाली होती. त्यानंतर सदर अकाऊंट धारकाचा शोध घेवुन चौकशी केली असता त्याने सदरची रक्कम इसम नामे - मोहम्मद जुबेर जावेद चव्हाण, वय २१ वर्षे, रा. ईस्लामपुर मोहल्ला, फतेपुर रोड, वार्ड-४९ ता.फत्तेपुर जि. सिकर, राजस्थान याला पाठविण्यात आली होती. तांत्रिक विश्लेषणाव्दारे मोहम्मद जुबेर जावेद चव्हाण यांचा सदरच्या गुन्हयात सहभाग निष्पन्न करुन, सायबर सेल टिमने ३००० कि.मी चा प्रवास ३ दिवसात करुन सदर आरोपीस पुढील तपासकामी हिंजवडी पोलीस स्टेशन यांचे ताब्यात देण्यात आले आहे. दाखल गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक घाडगे हिंजवडी पोलीस स्टेशन हे करत आहेत. **(सायबर सेल पिंपरी चिंचवड कडुन नागरीकांना आव्हान करण्यात येती की सायबर फसवणुकी बाबत नागरीकांनी www.cybercrime.gov.in या पोर्टल किंवा १९३० पर कॉल करुन तक्रार दयावी.)**

सदरची कारवाई मा. विनयकुमार चौबे पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. संदिप डोईफोडे पोलीस उपआयुक्त,गुन्हे पिंपरी चिंचवड, मा.विशाल हिरे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, पिंपरी चिंचवड यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि वैभव शिंगारे, सपोनि प्रविण स्वामी, पोलीस उपनिरीक्षक सागर पोमण, पोलीस उपनिरीक्षक रविंद्र पन्हाळे, पोशि २५६३ लोखंडे, पोशि ४२४० कारके, (सर्व नेमणुक सायबर सेल) यांच्या पथकाने केली आहे.

**(संदिप डोईफोडे)**
पोलीस उप-आयुक्त, गुन्हे,
पिंपरी चिंचवड.